४३२८

कार्यभार हस्तांतरीत करतांनाच अंतीम
वर्तन प्रमाणपत्र मिळविणे बाबत ----

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
परिपत्रक क्र.टिआरडब्ल्यू १३७९/सीआर ३९२/७९/एडीएम-९
मंत्रालय, मुंबई-४०००३२ दिनांकित २७/६/१९८०

CR1980062701

परिपत्रक :-

महाराष्ट्र कोषागार नियम २३५ प्रमाणे अंतीम वेतन प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी सरकारी नोकराची असते. महाराष्ट्र वित्तीय नियमावली नियम ७७ प्रमाणे कार्यभार हस्तांतरण करतेवेळी कार्यभार हस्तांतरण अहवालाची एक प्रत शासकीय कर्मचाऱ्याने संबंधित कोषागार कार्यालयाला पाठवायची असते. परंतू कार्यभार हस्तांतरण करतेवेळी उपरोल्लिखित दोन्ही नियमांचे पालन शासकीय कर्मचाऱ्यांकडून होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यावरुन शासन असा आदेश देत आहे की वरील बाब सर्व विभाग प्रमुख तथा कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या विशेषतः राजपत्रित कर्मचाऱ्यांच्या नजरेस आणून द्यावी. कारण कार्यभार हस्तांतरण अहवाल रजा, बदली, प्रशिक्षण प्रकरणी त्यांचे बाबतीत प्रामुख्याने आवश्यक असतो व त्या विना कोषागार अधिकारी अंतीम वेतन प्रमाणपत्र देण्यास सक्षम नसतात. त्यामुळे नवीन ठिकाणी वेतन मिळण्यास अशा राजपत्रित अधिकाऱ्यांना उशीर होतो.

२. पुष्कळदा उपरोल्लिखित नियमातील तरतूदींचे परिपालन न केल्यामुळे वेतन मिळण्यास उशीर झाल्यास संबंधीत कोषागार अधिकारी, संचालक, लेखा व कोषागारे ह्यांची कार्यालये तथा शासनाशी निष्कारण पत्रव्यवहार केला जातो व परिणामी ह्या कार्यालयांचा वेळ निष्कारण वाया जातो; म्हणून सर्व राजपत्रित शासकीय कर्मचाऱ्यांनी कार्यभार हस्तांतरणाच्या वेळेस उपरोल्लिखित बाबींची न चूकता पूर्तता करावी असे त्यांच्या निदर्शनास सर्व मंत्रालयीन विभागांनी/ विभाग/कार्यालय प्रमुखांच्या मार्फत आणावे अशी त्यांना विनंति करण्यात येत आहे.

नी. वि. देऊस्कर
(नी. वि. देऊस्कर)
सहायक सचिव, वित्त विभाग.

EL
16-7-80

प्रत रवाना :-

१) सर्व मंत्रालयीन विभाग
२) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
३) उपसंचालक लेखा व कोषागारे, पुणे/नागपूर
४) सर्व कोषागार अधिकारी
५) सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख
६) वित्त विभाग, एडीएम १,४,५,६,७ व ८
७) नीवड नस्ती, शाखा एडीएम-९

क्र. आस्था/ ...
पुणे दि. १९-७-१९८०
प्रत सर्व राजपत्रित अधिकारी यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित
...
जि. ... पुणे करिता